पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी व ऍटो क्लस्टर, चिंचवड या ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या कोवीड समर्पित रुग्णालयाकरीता (DCH) तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर पदे भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे उद्भवलेल्या कोवीड१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी व ऍटो क्लस्टर, चिंचवड या ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या कोवीड समर्पित रुग्णालयाकरीता (DCH) तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ३ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सदरचे पदांचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | नेफ्रोलॉजिस्ट | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाचा वैद्यकीय शाखेचा पदवीधर (एम.बी.बी.एस.) व सांविधानिक विद्यापीठाकडील एम.डी. नंतरची डी.एम. (नेफ्रो) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२. नेफ्रोलॉजी या शाखेतील कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३. इंडियन मेडीकल कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील रजिस्ट्रेशन आवश्यक |
| २ | कार्डिओलॉजिस्ट | १. सांविधिक विद्यापीठाची एम.डी./ डी.एन.बी. (मेडिसीन) पदवी व डी.एम./डी.एन.बी. कार्डीओलॉजी ही पदव्युत्तर परीक्षा पदवी<br>२. कार्डीओलॉजी या शाखेतील कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३. इंडियन मेडिकल कौन्सिल अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक |
| ३ | क्ष-किरण शास्त्रज्ञ (रेडिओलॉजिस्ट) | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील रेडिओलॉजी विषयातील एम.डी. / डी.एन.बी. पदवीधारक<br>२. रेडिओलॉजी या शाखेतील कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३. इंडियन मेडीकल कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील रजिस्ट्रेशन आवश्यक |
| ४ | पॅथॉलॉजिस्ट | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. व पॅथॉलॉजी विषयातील एम.डी. / डी.एन.बी. ही पदव्युत्तर पदवी<br>२. पॅथोलॉजी विषयातील कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३. इंडियन मेडीकल कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील रजिस्ट्रेशन आवश्यक |

वरीलप्रमाणे नमूद केलेली पदे कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी व ऍटो क्लस्टर, चिंचवड या ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या कोवीड समर्पित रुग्णालयाकरीता (Dedicated Covid Hospital) दरमहा र.रु. ८५,०००/- इतक्या मानधनावर महानगरपालिका निश्चित करेल त्या अटी व शर्तीवर भरणेत येणार आहेत. त्यानुसार अर्हताधारक उमेदवारांनी वैद्यकिय मुख्य कार्यालय, २रा मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, पिंपरी ४११०१८ येथे दि. १४-०९-२०२० ते दि. १६-०९-२०२० या कालावधीमध्ये समक्ष येऊन अर्ज दाखल करावा.

.. २ ..


E:\ABB\Corona\Recruitment\Advt.docx

टिप-

१. प्रस्तुतची जाहिरात महापालिकेच्या संकेतस्थळावर (www.pcmcinida.gov.in) नोकरी विषयक या सदरामध्ये प्रसिद्ध करणेत आलेली असुन जाहिराती सोबतचा विहीत नमुन्यातील अर्ज उमेदवारांनी परिपुर्ण भरावा व अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्र व गुणपत्रक, जन्मतारखेचा पुरावा, जातीचा दाखला, रुग्णालयीन कामाचे अनुभव प्रमाणपत्र इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज दाखल करावा.

२. उमेदवारांचे प्राप्त अर्जांची छाननी केलेनंतर पात्र उमेदवारांची यादी तयार करणेत येईल व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर उमेदवारांना रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देणेत येतील.

३. उमेदवारास कोणताही प्रवास तसेच निवासाचा खर्च देय असणार नाही .

४. प्रस्तुतच्या एकत्रीत मानधनावर करावयाच्या नेमणुका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास महानगरपालिकेमधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क सांगता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

५. ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, अथवा सदरची पदे कायम अस्थापनेवर भरणेत आले नंतर उमेदवारांची कोणत्याही नोटिशी शिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

६. निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार व नेमून दिलेल्या रुग्णालयाचे प्रमुखांनी सोपविलेले कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच कोवीड समर्पित रुग्णालयांमध्ये (Dedicated Covid Hospital) आवश्यकतेनुसार ३ शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल. तसेच आवश्यकतेनुसार ऑन कॉल ड्युटी करावी लागेल.

७. सदर पदासाठी जास्तीत जास्त वयोमर्यादा वर्षे ५० इतकी राहिल.

८. महापालिका विहित करेल त्या सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील.

९. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

वैद्यकिय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/३/कावि/५८१/२०२०
दि. १२-०९-२०२०

(डॉ.पवन साळवे)
अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८